क्र /यजिप/साप्रवि/आस्था-१/कावि१५९९/२०२३
यवतमाळ जिल्हा परिषद,यवतमाळ.
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक-२५/०९/ २०२३

प्रति,

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

विषय - **अनुकंपा तत्वाअंतर्गत नियुक्ती संदर्भात मुळ शैक्षणिक प्रमाणपत्र /इतर दस्ताऐवज ची तपासणी करण्याच्या दृष्टीने या कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत.**

संदर्भः- १. या कार्यालयाचे पत्र क्र.यजिप/साप्रवि/आस्था-१/कावि/१७४१ दिनांक ३०/०८/२०२३
२. या कार्यालयाचे पत्र क्र.यजिप/साप्रवि/आस्था-१/कावि/१४९७ दिनांक १२/०९/२०२३
३. या कार्यालयाचे पत्र क्र.यजिप/साप्रवि/आस्था-१/कावि/१५४८ दिनांक २०/०९/२०२३

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१ ते ३ अन्वये सन-२०२३ ची अनुकंपा पदभरती संदर्भात २०% पदभरती करिता दिनांक ०१/०१/२०२३ च्या प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठता यादीनुसार अ.क्र.१ ते ५५ उमेदवारांना दिनांक ११/०९/२०२३ व दिनांक २१/०९/२०२३ ते २५/०९/२०२३ या कालावधीत मूळ कागदपत्र तपासणी करिता बोलविण्यात आले होते. तसेच संदर्भीय पत्र क्र.३ अन्वये अंतिम पत्र म्हणून जे उमेदवार गैरहजर होते त्यांना प्रतिक्षावर ठेवून त्यांच्या पेक्षा ज्येष्ठता यादीत कनिष्ठ असलेले उमेदवारांना बोलविण्यात येईल असे कळविण्याबाबतचे पत्र जिल्हा परिषद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते.

त्यानंतर सुध्दा ज्येष्ठतायादीतील अ.क्र.१,३,४,६,८,९,१०,१४,१५,१७,१८,१९,२३,३६,४१ वरील उमेदवार मूळ कागदपत्र तपासणीकरिता वरील कालावधीत हजर झाले नाही. सन २०२३ ची अनुकंपा पदभरती करणे गरजेचे असल्यामुळे गैरहजर असलेल्या उमेदवारांना प्रतिक्षायादीवर ठेवून त्यांच्या पेक्षा कनिष्ठ उमेदवारांना बोलविण्यात येत आहे.

सबब वरील विषयाच्या अनुषंगानें कळविण्यात येते की, आपले नांव अनुकंपा तत्वावरील सामायिक सुधारित प्रतिक्षासूचीमध्ये अ.क्र.-----------वर आहे. त्या अनुषंगाने सद्यस्थितीत असलेल्या, आपल्या शैक्षणिक अर्हतेनुसार आपण उपलब्ध असलेल्या रिक्त पदाकरिता पात्र आहे किंवा कसे ? याबाबत मुळ प्रमाणपत्राची/आवश्यक दस्ताऐवजाची तपासणी करावयाची आहे.

तरी आपण आपले खालील मुळ प्रमाणपत्र/इतर आवश्यक दस्तऐवज व त्याची एक सांक्षाकित झेरॉक्स प्रत सह या विभागातील **आस्थापना-१** शाखेत **दिनांक ५ / १० /२०२३** रोजी **दुपारी १२ वाजता जिल्हा परिषद सभागृहात** प्रत्यक्ष प्रमाणपत्राच्या तपासणी करिता उपस्थित राहावें. जेणे करुन आपल्या नियुक्ती संदर्भात पुढील कार्यवाही करता येईल.

१.अर्जदाराचा शाळा सोडल्याचा दाखला.
२.अर्जदाराचे अद्यावत शैक्षणीक पात्रतेचे प्रमाणपत्र. (मूळ शैक्षणिक दस्ताऐवज)
३.मय्यत कर्मचा-याचे कुटूंबातील इतर कोणीही सद्स्य शासकीय/निमशासकीय सेवेत नसल्याबाबत स्टॅम्प पेपर वरील प्रतिज्ञालेख.
४.अर्जदाराचे जातीबाबत/ जात वैधता प्रमाणत्र
५.लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र.
६.जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वतः किंवा त्याचे आई-वडील किंवा आजी-आजोबा संबधित जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये २६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करित आहे याबाबतचा पुरावा, कोतवाल बुकाची नकलेची सत्यप्रत तसेच १००/- रु.च्या स्टॅम्पवरील नमुद असलेले वंशावल.

वरील प्रमाणे ही फक्त अनुकंपा तत्वावरील उमेदवारांची मुळ दस्तऐवजाची तपासणी आहे. त्यामुळे कोणत्याही उमेदवाराने सदर पत्र अनुकंपा तत्वावरील नियुक्ती संदर्भात आहे असे गृहीत धरु नये.

Mainak 25.09.2023

(डॉ.मैनाक घोष, भा.प्र.से. )
मुंख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ